Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary.stateboard@gmail.com
Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 I EPABX -25705000 Secretary(P) : 25651750

गोपनीय/महत्वाचे

क्र.राम/परीक्षा-२/३९५
पुणे-४११००४
दिनांक-०३/०२/२०२१

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषय:-माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाबाबत.
संदर्भ:-१)शासन निर्णय क्र.:अभ्यास-२०२०/प्र.क्र.११९/एसडी-४, दिनांक २४ जुलै, २०२०

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुलक्षून आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र(इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) सन २०२१ परीक्षेच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी कोविड-१९ या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर इ.१ ली ते इ.१२ वी चा पाठयक्रम २५ टक्के कमी करण्यास शासन निर्णय क्र.:अभ्यास-२०२०/प्र.क्र.११९/एसडी-४, दिनांक २४ जुलै, २०२० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) एप्रिल-मे २०२१ च्या परीक्षेस नियमित(Regular) व तुरळक (Isolated) विषय घेऊन, २०२१ मध्ये प्रथमच खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होणारे विद्यार्थी तसेच आय.टी.आय(औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit साठी काही विषयांना प्रविष्ट होणारे विद्यार्थी) यांना शासननिर्णयानुसार २५ टक्के कमी केलेल्या पाठयक्रमानुसार प्रविष्ट होता येणार आहे.

२) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) एप्रिल-मे २०२१ परीक्षेस पुनर्परिक्षार्थी (Repeater), श्रेणीसुधार (Class Improvement Scheme) म्हणून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना, सदर विद्यार्थी हे मार्च २०२० च्या परीक्षेस प्रविष्ट झालेले असल्याने, १००% अभ्यासक्रमानुसार प्रविष्ट व्हावे लागेल.

३) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) एप्रिल-मे २०२१ परीक्षेस पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार प्रविष्ट होणाऱ्या नियमित(Regular) व तुरळक (Isolated) विषय घेऊन, २०२१ मध्ये प्रथमच खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होणारे विद्यार्थी तसेच आय.टी.आय(औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit साठी काही विषयांना प्रविष्ट होणारे विद्यार्थी) यांना शासननिर्णयानुसार २५ टक्के कमी केलेल्या पाठयक्रमानुसार प्रविष्ट होता येणार आहे.

कृ.मा.प.

४) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) एप्रिल-मे २०२१ पुनर्परिक्षार्थी (Repeater), श्रेणीसुधार (Class Improvement Scheme) म्हणून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना, सदर विद्यार्थी हे मार्च २०२० च्या परीक्षेस प्रविष्ट झालेले असल्याने, १००% अभ्यासक्रमानुसार प्रविष्ट व्हावे लागेल.

तरी उपरोक्तप्रमाणे सर्व बाबी आपल्या विभागातील मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्य मंडळ,पुणे-०४

क.कोविमं/माध्य/उ.मा/गोप./६९५८
दिनांक: ०५/०२/२०२१

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
मान्यता प्राप्त सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर

उपरोक्त परिपत्रक सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्याची उचित कार्यवाही करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर